मा. महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका
ठराव क्र. १/ ६८
दिनांक :- ३०/०६/२०२१

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. :- मआ/साप्रवि/आस्था/ २९७२
दिनांक :- 01/07/2021

## -: आज्ञापत्र :-

**विषय :-** श्री. सतेज चंद्रकांत सोनकांबळे (वैद्यकीय अधिकारी, श्रेणी – ब) यांना पुणे महानगरपालिका सेवेतून कमी करणेबाबत.

**संदर्भ :-** १) आज्ञापत्र जा.क्र. अमआ/उआ(ज.)/से/४०४० दिनांक : ०६/०२/२०१३
२) मा. महापालिका आयुक्त ठ.क्र. १/७१३ दिनांक : १७/०३/२०२१
३) मा. महापालिका आयुक्त ठ.क्र. १/६२ दिनांक :३० /०६/ २०२१

पुणे महानगरपालिका आस्थापनेवर आरोग्य कार्यालयाकडील वैद्यकीय अधिकारी (श्रेणी–ब) या पदावरील सेवक श्री. सतेज चंद्रकांत सोनकांबळे यांची संदर्भ क्र.१ चे आज्ञापत्रान्वये वैद्यकीय अधिकारी (श्रेणी–ब) या पदावर नेमणूक करण्यात आली आहे.

श्री. सतेज चंद्रकांत सोनकांबळे "वैद्यकीय अधिकारी" यांनी एकाचवेळी अथवा कार्यरत पदाचा राजीनामा दिल्याखेरीज अन्य ठिकाणी सेवा केल्याने पुणे महानगरपालिका सेवाविनियमाचे उल्लंघन केले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे श्री. सोनकांबळे यांनी सेवा विनियम ११ - (ब) व (क) चा आणि महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक ) नियम १९७९ मधील १६(१) चा भंग केल्याचे सिद्ध झाले आहे.

सबब श्री. सतेज चंद्रकांत सोनकांबळे यांनी सेवाविनियम ११ (ब) व (क) आणि महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक ) नियम १९७९ मधील १६(१) चा भंग केल्याने तसेच विनापरवानगी ४ वर्षे ५ महिने २६ दिवस गैरहजर राहून आरोग्य सेवेसारख्या अत्यावश्यक सेवेत कर्तव्यात हयगय केल्यामुळे त्यांना पुणे महानगरपालिका सेवेतून कमी करण्यास संदर्भ क्र. २ चे ठरावान्वये मा. महापालिका आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे.

सबब श्री. सतेज चंद्रकांत सोनकांबळे, वैद्यकीय अधिकारी यांचेबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.